# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.06.2026** **वारःबुधवार**

---

1. बदलत्या जागतिक परिस्थितीत सामायिक आव्हानांचा सामना करण्यासाठी 'ब्रिक्स'ची भूमिका अत्यंत महत्त्वाची- पंतप्रधानांचं ब्रिक्स परिषदेत प्रतिपादन
2. आगामी खरीप हंगामासाठी सतर्क राहण्याचे कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांचे निर्देश
3. कोचिंग संस्थांचे नियमन अधिक कडक करण्यासाठी उत्तरप्रदेशमध्ये विशेष मोहिम आणि
4. फिफा फुटबॉल स्पर्धेत पोर्तुगलचा उजबेकिस्तानवर विजय, क्रिस्टीआनो रोनाल्डोची ऐतिहासिक कामगिरी

**<u>पंतप्रधान</u>**

बदलत्या जागतिक परिस्थितीत, दहशतवाद आणि सायबर सुरक्षेपासून ते उदयोन्मुख तंत्रज्ञानापर्यंतच्या सामायिक आव्हानांचा सामना करण्यासाठी आणि सुरक्षा सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी 'ब्रिक्स'ची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. पंतप्रधानांनी काल नवी दिल्ली इथं ब्राझील, रशिया, चीन आणि दक्षिण आफ्रिका या 'ब्रिक्स' देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्यांची भेट घेतली. भारताच्या 'ब्रिक्स' अध्यक्षपदाच्या कार्यकाळात व्यावहारिक सहकार्य वाढवणं, 'ग्लोबल साउथ' अर्थात विकसनशील देशांसाठीच्या प्राधान्यक्रमांना पाठिंबा देणं, अधिक सुरक्षित आणि सर्वसमावेशक जगाच्या निर्मितीमध्ये योगदान देणं या गोष्टींवर भर दिला जाईल. असं त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे. दरम्यान, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि रशियाचे सुरक्षा सल्लागार सर्गेई शोईगु यांनी सहकार्याबाबत, तसंच रशियाने मांडलेल्या प्रस्तावांवर चर्चा केली. दिल्लीत आयोजित 16 व्या 'ब्रिक्स' राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या बैठकीदरम्यान त्यांची भेट झाली. भारत-रशिया यांच्यातील 'विशेषाधिकारप्राप्त धोरणात्मक भागीदारी'नुसार, विविध क्षेत्रांतील द्विपक्षीय सहकार्याच्या प्रगतीचा त्यांनी आढावा घेतला.

**<u>भारत-कतार</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कतारचे अमीर, शेख तमीम बिन हमाद अल-थानी यांनी काल दूरध्वनीवरुन संवाद साधला. गेल्या रविवारी कतारमधील 'रास लाफान इंडस्ट्रियल सिटी' इथं झालेल्या अपघातात भारतीय नागरिकांचा मृत्यू झाल्याबद्दल कतारच्या अमिरांनी शोक व्यक्त केला. बाधित कुटुंबांबद्दल सहानुभूती दर्शवल्याबद्दल आणि जखमींना त्वरित वैद्यकीय मदत पुरवल्याबद्दल मोदी यांनी कतारच्या नेत्याचे आभार मानले. दोन्ही नेत्यांनी आपापल्या नागरिकांचे कल्याण आणि सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा यावेळी पुनरुच्चार केला.

**<u>कृषीमंत्री</u>**

'एल निनो' स्थितीच्या प्रभावामुळे यावर्षी मान्सूनचा पाऊस कमी राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शेती आणि शेतकऱ्यांवर होणारा परिणाम लक्षात घेऊन केंद्र सरकार आगामी खरीप हंगामासाठी तयारी करत आहे. अशी ग्वाही कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल, नवी दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत दिली. देशात आतापर्यंत सरासरीपेक्षा सुमारे 43 टक्के कमी पाऊस झाला आहे आणि जुलै महिन्यातही मान्सून कमकुवत राहण्याची शक्यता आहे. कमी पावसामुळे एकंदर 315 जिल्हे प्रभावित होऊ शकतात; यामध्ये सिंचनाची सुविधा अत्यंत मर्यादित अर्थात 25 टक्क्यांपेक्षा कमी सिंचन क्षेत्र असलेले 111 'उच्च-प्राधान्य' जिल्ह्यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, 25 ते 50 टक्के सिंचन क्षेत्र असलेले 76 जिल्हे 'मध्यम-प्राधान्य' श्रेणीत, तर धरणं आणि इतर स्रोतांद्वारे तुलनेने चांगल्या सिंचन सुविधा उपलब्ध असल्याने 128 जिल्ह्यांचे 'कमी-प्राधान्य' श्रेणीत वर्गीकरण करण्यात आले आहे. यापैकी बहुतांश जिल्हे मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, बिहार, झारखंड, तेलंगण, आंध्र प्रदेश आणि ओडिशा या 12 राज्यांमध्ये आहेत. बाधित जिल्ह्यांसाठी आपत्कालीन योजना तयार करण्यात आल्या असून यामध्ये पर्यायी पिकं, कमी कालावधीत येणाऱ्या वाणांची लागवड, पीक विविधता आणि उपलब्ध जलस्रोतांचा अधिक चांगल्या प्रकारे वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. असं चौहान म्हणाले.

**<u>पद्म</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत पद्म पुरस्कारांच्या दुसऱ्या टप्प्यातले सन्मान प्रदान करण्यात आले. राज्यातल्या 7 मान्यवरांचा कालच्या सन्मानार्थींमध्ये समावेश होता. पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार रोहित शर्मा, वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. आर्मिडा फर्नांडिस, वारली आदिवासी परंपरेचे जतन करणारे 89 वर्षीय तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा, अभिनेते, दिग्दर्शक आर. माधवन, आणि उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल अशोक खाडे यांना पद्मश्री सन्मान प्रदान करण्यात आला. चित्रपट, दूरदर्शन आणि रंगभूमी या तिन्ही माध्यमांमध्ये चार दशकांहून अधिक काळ उल्लेखनीय कार्य करणारे ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<u>होर्मुझ</u>**

आंतरराष्ट्रीय सागरी संघटना अर्थात IMO ने हॉर्मुझच्या सामुद्रधुनीत अडकलेल्या 11 हजारांहून अधिक खलाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याची योजना जाहीर केली आहे. IMO चे सरचिटणीस अर्सेनियो डोमिंग्वेझ यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, या मोहिमेसाठी आवश्यक असलेली सुरक्षिततेची हमी आणि सुरक्षित जलवाहतुकीसाठी अनुकूल परिस्थितीची खात्री केली आहे. ही मोहीम इराण आणि अमेरिका यांच्यातील सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर हाती घेण्यात आली असून, इराण, ओमान, या क्षेत्रातील इतर देश आणि सागरी उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांच्या सहकार्याने ही मोहिम राबवली जाणार आहे. हॉर्मुझची सामुद्रधुनी कोणत्याही शुल्काशिवाय व्यापारी जहाजांसाठी पूर्णपणे खुली आहे. असं जिनिव्हा इथं संयुक्त राष्ट्रांच्या कार्यालयातील इराणचे राजदूत आणि स्थायी प्रतिनिधी अली बहरीनी यांनी जाहीर केलं. इराण आणि अमेरिका यांच्यातील वाटाघाटींच्या आधारे 60 दिवसांनंतर परिस्थितीचा आढावा घेतला जाईल. असंही ते म्हणाले.

**<u>उत्तरप्रदेश</u>**

लखनऊमधील शिकवणी वर्गात नुकत्याच घडलेल्या आगीच्या घटनेनंतर, या इमारतीच्या मालकाला 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. उत्तर प्रदेश सरकारने राज्यभरात कार्यरत कोचिंग संस्थांचे नियमन अधिक कडक करण्यासाठी आणि बेकायदेशीरपणे चालणाऱ्या कोचिंग केंद्रांविरुद्ध कारवाई करण्यासाठी एक विशेष मोहीम सुरू केली आहे. संपूर्ण राज्यातील अशा केंद्रांवर अग्निसुरक्षा लेखापरीक्षण केलं जाईल असं मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काल सांगितलं. तळघरातील कोचिंग सेंटर, नर्सिंग होम किंवा इतर व्यावसायिक आस्थापना चालवणं कोणत्याही परिस्थितीत मान्य नसल्याचंही त्यांनी सांगितलं. सर्व जिल्हा दंडाधिकाऱ्यांना त्यांच्या संबंधित जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या सर्व कोचिंग संस्थांचे सर्वसमावेशक सर्वेक्षण करण्याचे आणि त्यांची यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अशा माहिती आकाशवाणीच्या वार्ताहरानं दिली.

**<u>ड्रोन, आपत्ती-बैठका</u>**

महाराष्ट्र शासनाच्या विभागांमधील कामकाज अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि लोकाभिमुख करण्यासाठी 'महा एआय'-प्रगत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी 'महाराष्ट्र हब' हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देशातील पहिलाच अभिनव उपक्रम विकसित करण्यात आला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. महा एआय प्लॅटफॉर्मबाबत विधानभवनात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री काल बोलत होते. या उपक्रमाची अंमलबजावणी राज्यातल्या विविध विभागात लवकरच होणार असल्याचं ते म्हणाले.

**<u>सीतारमण</u>**

संवेदनक्षम अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी, शाश्वत विकासाला गती देण्यासाठी आणि सर्वसमावेशक वाढ सुनिश्चित करण्यासाठी अधिक मजबूत बहुपक्षीय सहकार्याचे आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल केलं. नवी दिल्ली इथं आयोजित 'ग्लोबल कन्व्हर्जन्स फॉर ग्रोथ समिट' या कार्यक्रमांत दुरस्थ माध्यमातून संबोधित करताना त्या बोलत होत्या. लोकसंख्याशास्त्र, विकासाचे टप्पे, संसाधनांची उपलब्धता आणि आर्थिक संरचना तसंच देशांतर्गत गरजांचे प्रमाण भिन्न असते हे ओळखून, अत्याधिक आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या असंतुलन कसे कमी करता येईल यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. असं त्या म्हणाल्या.

**<u>पियुष गोयल</u>**

भारत आणि अमेरिका यांच्यातील विस्तारणारी आर्थिक भागीदारी मजबूत असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटले आहे. काल नवी दिल्ली इथं अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीर आणि भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जिओ

गोर यांची त्यांनी भेट घेतली. आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी आणि विकास आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी नवीन संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने अमेरिकेसोबत रचनात्मकपणे काम करण्यास भारत कटिबद्ध असल्याचं गोयल यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे.

**भारत-पाकिस्तान**

पाकव्याप्त काश्मीरमधील परिस्थितीबाबत पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी केलेल्या विधानांवर भारताने तीव्र शब्दांत टीका केली आहे. या क्षेत्रात पाकिस्तानच्या अनेक दशकांपासून राबवल्या जाणाऱ्या धोरणांचा हा थेट परिणाम आहे; या धोरणांमुळे या भागातील नागरिकांचं आर्थिक शोषण, मूलभूत अधिकारांची पायमल्ली केली जात आहे तसंच प्रशासकीय दडपशाही अशा मुद्यांमुळे नागरिकांची नाराजी यांचा समावेश आहे. असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं.

**फिफा**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत अमेरिकेतील ह्युस्टन इथं खेळल्या गेलेल्या क गटातल्या सामन्यात पोर्तुगलनं उझबेकिस्तानवर 5-0 असा विजय मिळवला. ख्रिस्टियानो रोनाल्डोनं दोन गोल करत पोर्तुगलला हा दणदणीत विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. या गोलसह, सहा विश्वचषक स्पर्धांमध्ये गोल करणारा रोनाल्डो पहिला खेळाडू ठरला. त्याला 'सामनावीर' म्हणून घोषित करण्यात आले. तर इंग्लंड आणि घाना यांच्यात झालेला एल गटातला सामना 0-0 अशा बरोबरीत सुटला. 'गट एल' मधल्या आणखी एका सामन्यात, थोड्यावेळापूर्वी क्रोएशिया आणि पनामा यांच्यातल्या लढतीत क्रोएशियानं स्पर्धेतला पहिला विजय मिळवला.

**हवामान**

पुढील दोन दिवसांत नैऋत्य मोसमी वारे महाराष्ट्र, छत्तीसगड आणि मध्य प्रदेशच्या काही भागांत पुढे सरकण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पुढील तीन दिवसांत किनारपट्टीवरील कर्नाटक, कोकण आणि गोव्यात मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.